पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११००७.

संदर्भ: परीक्षा/बी.ए./XI/113 दि. २८.६.२०११

मा. प्राचार्य,
सर्व संलग्न कला महाविद्यालये.

विषय : एस.वाय./टी.वाय.बी.ए. एप्रिल/मे, २०११ परीक्षेच्या निकालाबाबत...

महोदय/महोदया,

एस.वाय./टी.वाय.बी.ए. एप्रिल/मे, २०११ मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल शुक्रवार दि.१.७.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे महाविद्यालयात वितरीत करण्यात येईल.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल शुक्रवार दि.१.७.२०११ रोजी १२.०० ते ३.०० या वेळेत परीक्षा विभागातून घेऊन जावयाचा आहे.

२. अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून शुक्रवार दि.१.७.२०११ रोजी दुपारी १२.०० ते ३.०० या वेळेत घेऊन जावयाचा आहे.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी.. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता, महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील दुरुस्त्या त्वरीत करुन घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

आपला विश्वासू,

28/06/2011

परीक्षा नियंत्रकांकरिता

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. उपकुलसचिव, परीक्षा-१
२. मा. पध्दती विश्लेषक, डी.पी.यु.
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग.
४. मा. जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, पुणे विद्यापीठ, पुणे-७.
५. विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक/अहमदनगर, यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना वेळेवर देण्याची व्यवस्था करावी.
६. कक्षाधिकारी, बहि:स्थ परीक्षा विभाग.
७. गृहव्यवस्थापक, गृहव्यवस्थापन विभाग, अहमदनगर व नाशिक उपकेंद्रास जाण्यासाठी शुक्रवार, दि.१.७.२०११ रोजी सकाळी ८.०० वाजता दोन गाडया उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

A१/ba.marathi/४२